वाचले:- १.शासन महसुल व वनविभागाकडील ज्ञापन क्रमांक जमीन ३१अ-/०५/प्रक्र.२६/ज.६,दिनांक ११/६/२००७

२.म.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक मशा/कावोर/जमीन२/२०१४२,दिनांक ३०/६/२००७

३.महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ व त्या खालील नियम

४.चेअरमन आदिवासी देवमोगरा एज्युकेशन सोसायटी नटावद ता.जि.नंदुरबार यांचा अर्ज दिनांक ६/३/२००२

---

क्रमांक २००७/ब/कक्ष.२/गावठाण/काविः- ३५८
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
नंदुरबार दिनांक :- १८/६/२००७

**आदेश ,**

ज्या अर्थी, चेअरमन, आदिवासी देवमोगरा एज्युकेशन सोसायटी नटावद ता.जिल्हा नंदुरबार यांनी मौजे इसाईनगर ता.जिल्हा नंदुरबार येथील सरकारी ग.न. २०१ क्षेत्र ४.९४ हे.आर.पैकी २.०३ हे.आर जागा अनुक्रमे १८८०.११ चौ.मी. क्षेत्र शाळा इमारतीसाठी व १८४१९.८९ चौ.मी. क्षेत्र शाळेच्या क्रिडागणासाठी मागणी केलेली आहे. ग्रामपंचायत इसाईनगर तालुका नंदुरबार यांनी ठराव क्रमांक ४,दिनांक १८/०२/२००२ नुसार जागा देणे बाबत ठराव पारीत केलेला आहे. तहसिलदार नंदुबार यांनी चौकशी करुन प्रस्ताव सादर केला आहे.

ज्या अर्थी, या कार्यालयाचे पत्र क्रमांक २००४/गावठाण/काविर०८,दिनांक २१/७/२००४ नुसार मौजे इसाईनगर ता.जिल्हा नंदुरबार येथील सरकारी ग.न. २०१ क्षेत्र ४.९४ हे.आर पैकी २.०३ हे.आर जागा अनुक्रमे १८८०.११ चौ.मी. क्षेत्र शाळा इमारतीसाठी व १८४१९.८९ चौ.मी. क्षेत्र शाळेच्या क्रिडागणासाठी मिळणे बाबत प्रस्ताव विभागीय आयुक्त नाशिक यांचे मार्फत शासनास सादर करण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी, शासन महसुल व वनविभागाकडील ज्ञापन क्रमांक जमीन ३१अ/०५/प्र.क्र.२६/ज.६,दिनांक ११/६/२००७ नुसार मौजे इसाईनगर ता.जिल्हा नंदुरबार येथील सरकारी ग.न. २०१ क्षेत्र ४.९४ हे.आर पैकी २.०३ हे.आर जागा अनुक्रमे १८८०.११ चौ.मी. क्षेत्र शाळा इमारत बांधकामासाठी व १८४१९.८९ चौ.मी. क्षेत्र शाळेच्या क्रिडागणासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अर्थी, मौजे इसाईनगर ता.जिल्हा नंदुरबार येथील ग.न. २०१ क्षेत्र ४.९४ हे.आर .हे ग्रामपंचायत धानोरा तालुका नंदुरबारकडे निहीत आहे.म्हणुन मुबंई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१ (१अ ) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार ग.न. २०१ क्षेत्र ४.९४ हे.आर पैकी २.०३ हे.आर क्षेत्र हे ग्रामपंचायतीकडुन काढुन , महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २२ अन्वये सरकारी पडीतात दाखल करुन, क्षेत्र २.०३ हे.आर पैकी १८८०.११ चौ.मी. क्षेत्र हे महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनीची विल्हेवाट करणे ) नियम १९७१ चे नियम ५ व ६ नुसार महसुल मुक्त व सारामाफीने शाळा इमारतीसाठी याव्दारे खालील अटी व शर्तीवर मंजुर करीत आहे.

- **शर्ती:-**

१. सदर जमीनीचा वापर केवळ मंजुर प्रयोजनार्थ म्हणजे शैक्षणिक प्रयोजनार्थ करण्यात यावा. व्यापारीदृष्टीकोनातुन त्यांचा वापर करता येणार नाही.

२. मंजुर करण्यात आलेली जमीन संस्था भोगवटदार वर्ग २ म्हणुन धारण करील व शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत /गहाण/तारण करणार नाही.

३. जमीन मंजुरीच्या सर्व अटी /शर्ती मान्य असल्या बाबत लेखी व अभिप्रमाणित केलेले हमीपत्र संस्थेकडुन घेण्यात यावे. त्याशिवाय गावी अंमल देण्यात येऊ नये.

४. संस्थेस शैक्षणिक विभागाकडुन सलग मान्यता न मिळाल्यास प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात येतील.

५. प्रस्तुतचे आदेश कोणत्यही क्षणी विनासुचा मागे घेणे /संस्थेकडुन जमीन काढुन घेणे इत्यादींचे अधिकार हे शासनाने राखुन ठेवलेले आहे.

६. वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जागेचा ताबा संस्थेकडुन काढण्यात येईल. त्या पोटी कोणताही मोबदला संस्थेला दिला जाणार नाही.

**७. मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किमान १०% क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे बंधनकारक राहिल.या अटीचे उल्लघंन झाल्याचे निदर्शनास आल्यास तो शर्तभंग समजुन कार्यवाही केली जाईल.**

**( जयंत गायकवाड )**
**जिल्हाधिकारी नंदुरबार**

प्रत:- म.चेअरमन, आदिवासी देवमोगरा एज्युकेशन सोसायटी नटावद ता.जिल्हा नंदुरबार

प्रत:- म.उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरवार यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.

प्रत:- म.तहसिलदार नंदुरबार यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

२/- उपरोक्त आदेशा बाबत तसेच जमीन मंजुरीच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचे लेखी व अभिप्रमाणित केलेले हमीपत्र संस्थेकडुन घेणे बाबत शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ०५/२००६/प्र.क्र.४३/ज२,दिनांक ३२ ऑक्टोबर २००६ मध्ये दिलेल्या निदेशाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. त्याशिवाय गावी अंमल देण्यात येऊ नये.

**जिल्हाधिकारी नंदुरबार करीता.**